तरुण भारत संवाद
शनिवार २० जुलै २०२४

# आंतरराष्ट्रीय फिडे रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत ऋषिकेश उपविजेता

## १९०० फिडे रेटिंग गटात कामगिरी : स्पर्धेच्या मेरिटमध्येही पटकावले आठव्या स्थानासह ७९ रेटिंग

प्रतिनिधी
कोल्हापूर

भोपाळ (मध्यप्रदेश) येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय फिडे रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेतील १९०० फिडे रेटिंग या गटात कोल्हापूरच्या ऋषिकेश कबनुरकरने ९ फेरींत ७ गुण मिळवून उपविजेतेपद पटकावले. तसेच त्याने स्पर्धेच्या मेरिटमध्ये आठवा क्रमांकही प्राप्त केला.

भोपाळ बुद्धिबळ असोसिएशनच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. बक्षीस वितरण समारंभात ऋषिकेशला १५ हजार रुपये आणि चषक देऊन सन्मानित करण्यात आले.

ऋषिकेशने महाराष्ट्रातर्फे स्पर्धेत प्रतिनिधीत्व केले. त्याने स्पर्धेतील ९ पैकी ६ सामन्यांमध्ये नामवंत बुद्धिबळपटूंना पराभूत करत सहा गुणांची कमाई केली. दोन अवघड सामन्यात त्याने चाणाक्षपणे बरोबरी साधत १ गुण प्राप्त केला. एका सामन्यात त्याला पराभव पत्करावा लागला. स्पर्धेतील एकुणच उठावदार कामगिरीमुळे ऋषिकेशच्या मुळच्या १८२६ फिडे रेटिंगमध्ये ७९ रेटींगची भर पडली आहे.

दरम्यान, या स्पर्धेत भारतातील २९७ बुद्धिबळपटू सहभागी झाले होते. त्यापैकी २१३ जण फिडे रेटिंग मिळवलेले होते. स्पर्धेतील उपविजेता ऋषिकेश हा स्वामी विवेकानंद महाविद्यालयात शिकत असून त्याला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव व प्राचार्य शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख प्रा. विकास जाधव व प्रशिक्षक माधव देवस्थळी यांचे मार्गदर्शन लाभत आहे.



कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय फिडे रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत यश मिळवलेल्या ऋषिकेश कबनुरकरला बक्षीस देऊन गौरवताना मान्यवर.

### ऋषिकेशने ऑल इंडिया चॅम्पियनला हरवले

स्पर्धेतील नवव्या फेरीत ऋषिकेशची तामिळनाडूतील एकेकाळचा ऑल इंडिया चॅम्पियन हरिष शर्मा याच्याशी लढत झाली. पाच वेळेचा विश्वविजेता असलेल्या विश्वनाथन आनंदला हरिषने एकेकाळी पराभूत केले होते. त्यामुळे नवव्या फेरीत कोण जिंकणार याची उत्सुकता लागून राहिली होती. शिवाय लढत सुरु करण्यापूर्वी ऋषिकेश व हरिष हे दोघेही प्रत्येकी ६ गुणांनी आघाडीवर होते.

या महत्वपूर्ण लढतीत हरिषला पराभूत केल्यानंतर ऋषिकेशचा स्पर्धेच्या १९०० फिडे रेटिंग या गटात उपविजेतेपद कब्जा होणार होता. ऋषिकेशनेही अतिशय संयमाने चाली करत हरिषला पराभूत करत एक गुणाची कमाई केली. या गुणामुळे त्याला उपविजेतेपद मिळाले, असे ऋषिकेशचे प्रशिक्षक कृष्णात पाटील यांनी सांगितले.

20/07/2024
20/7/24